आज जिल्हास्तरीय शालेय क्रीडा महोत्सवाचा बक्षीस वितरण व समारोप

शिराळा दि. १५ : तीन दिवशीय या जिल्हास्तरीय शालेय क्रीडा महोत्सवाचे बक्षीस वितरण व समारोपीय कार्यक्रम दिनांक १६ फेब्रुवारीला दुपारी चार वाजता आयोजित केला आहे.

बक्षीस वितरण जिल्हा परिषदेचे शिक्षण व बांधकाम सभापती जयंतराव देशमुख यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष नितीनभाऊ गोंडाणे राहणार आहे. विशेष अतिथी म्हणून अमरावती पंचायत समितीच्या सभापती श्रीमती वहीदाबी युसुफ शहा, उपसभापती सुनील उर्फ बाळासाहेब देशमुख, शिक्षण समिती सदस्य श्रीमती अलकाताई देशमुख, श्यामभाऊ मसराम, अनिल डबरासे, राजेंद्र पाटील, राजेंद्र बहुरूपी, श्रीमती पूजाताई येवले, श्रीमती शिल्पाताई भलावी , श्रीमती वैशालीताई बोरकर, जिल्हा परिषद सदस्य प्रकाशभाऊ साबळे, गजाननभाऊ राठोड, श्रीमती भारतीताई गेडाम, दिनेशभाऊ टेकाम, पंचायत समिती सदस्य श्रीमती संगीताताई तायडे, अजयभाऊ भुयार, गणेशभाऊ कडू, श्रीमती रोशनीताई अळसपुरे, श्रीमती मीनलताई डकरे, श्रीमती रश्मिताई घुले, वीरेंद्रभाऊ लंगडे , लक्ष्मणभाऊ सोळंके यांच्यासह शिराळा ग्राम पंचायत चे सरपंच सचिन देशमुख, उपसरपंच श्रीमती तेजस्विनी आमले यांची उपस्थिती राहणार आहे.

या जिल्हास्तरीय शालेय क्रीडा

महोत्सवात जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील खेळाडू व मार्गदर्शक शिक्षकांनी सहभागी होण्याचे आवाहन प्राथमिकचे शिक्षणाधिकारी श्री रामभाऊ तुरणकर, माध्यमिकच्या शिक्षणाधिकारी श्रीमती नीलिमा टाके, गटविकास अधिकारी श्रीमती माया वानखडे, निरंतरच्या शिक्षणाधिकारी श्रीमती प्रिया देशमुख, उपशिक्षणाधिकारी श्री.वामन बोलके, गटशिक्षणाधिकारी डॉ.नितीन उंडे यांनी केले आहे. अशी माहिती क्रिडा विभागाच्या प्रसिद्धी विभागाने दिली.

जिल्हा परिषद शाळेतील चिमुकल्यांच्या स्वागतगीतावरील नृत्यासह अप्रतिम अशा सांस्कृतिक निदर्शनाने माझे मन आज गहिवरून आले आहे, ग्रामीण भागातील या विद्यार्थ्यांना शिक्षणासह क्रीडा व कला कौशल्यातही निपून बनविण्याचे काम जिल्हा परिषदेचे शिक्षक उत्तमरीत्या करीत असल्याचे मत ऍडव्होकेट आमदार यशोमती ठाकूर यांनी व्यक्त केले.

जिल्हास्तरीय प्राथमिक शालेय क्रीडा महोत्सवाचे शिराळा येथील कस्तुराबाई विद्यालय, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाच्या प्रांगणात आज शानदार उद्घाटन झाले. याप्रसंगी आमदार श्रीमती यशोमती ठाकुर बोलत होत्या. अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष नितीन गोंडाणे होते.

प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष दत्ताभाऊ ढोमणे, शिक्षण व बांधकाम सभापती जयंतराव देशमुख, वित्त व आरोग्य समिती सभापती बळवंत वानखडे, समाज कल्याण सभापती श्रीमती सुशीला कुकडे, मुख्य कार्यपालन अधिकारी श्रीमती मनीषा खत्री, महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष मनोज देशमुख, अमरावती पंचायत समितीच्या सभापती श्रीमती वहीदाबी इसुफ शहा, शिक्षण समिती सदस्य श्रीमती अलका देशमुख, श्याम मसराम, अनिल डबरासे, राजेंद्र बहुरूपी, पंचायत समिती सदस्य श्रीमती संगीता तायडे, अजय भुयार, गणेश कडू, वीरेंद्र लंगडे यांच्यासह शिराळा ग्राम पंचायत चे सरपंच सचिन देशमुख, उपसरपंच श्रीमती तेजस्विनी आमले, बापूराव गायकवाड, श्री जाधव, सचिन पाटील, रमेश खातदेव, सुनील कडू, प्रमोद गावंडे ,जियाभाई, मुकुंद देशमुख, मीसबिर पठाण, यसुफ भाई, गजानन झाकर्डे, लोकेश केणे, आदींची उपस्थिती होती.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते क्रिडा ध्वजाचे ध्वजारोहण करून क्रीडा ज्योत प्रज्वलित करण्यात आली. गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व डॉ पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन व दिप प्रज्वलनाने क्रीडा महित्सवाचे रीतसर उदघाटन झाले.

मुलींचे लेझीम पथक, चिमुकल्यांनी केलेली अश्वावरील जिजाऊ व छत्रपती शिवाजी महाराजाची वेशभूषा सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. फटाक्यांच्या आतिषबाजीत पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी कामानापूर, शिराळा , भिलखेडा व कवठाळ येथील शाळेचे निदर्शने झाली. याप्रसंगी सेवानिवृत्त झाल्याबद्दल गटशिक्षणाधिकारी मिनाक्षी भटकर व अशोक इंगळे यांचा मान्यवरांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

या जिल्हास्तरीय शालेय क्रीडा महोत्सवात जिल्ह्यातील सुमारे पाच हजार खेळाडू व मार्गदर्शक शिक्षक सहभागी झाले आहे. तीन दिवसीय महोत्सवात सांघिक व वैयक्तिक खेळासह सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. कार्यक्रमाला सर्व पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, सर्व शिक्षक संघटनांचे पदाधिकारी, नियोजन समितीचे सर्व सदस्य उपस्थित होते.

प्रास्ताविक प्राथमिकचे शिक्षणाधिकारी रामभाऊ तुरांकर, संचालन शैलेश दहातोंडे यांनी केले तर आभार गटशिक्षणाधिकारी डॉ. नितीन उंडे यांनी मानले. अशी माहिती क्रीडा महोत्सव प्रसिद्धी समितीचे राजेश सावरकर, विनायक लकडे यांनी दिली.

घुईखेडच्या यात्रा महोत्सवात यात्रेकरूंची प्रचंड गर्दी

आकाश पाळणा, टुरींग टॉकीज, खेळण्याचे दुकान व लोकपयोगी विविध साहित्यांनी सजली दुकाने

(उत्तमराव गावंडे)

चांदूर रेल्वे दि. १५ : महाराष्ट्र राज्यासह इतर राज्यातील हजारो भाविकांचे श्रध्दास्थान असलेले विदर्भातील एकमेव संजिवन समाधी असलेले चांदूर रेल्वे तालुक्यातील घुईखेड येथील श्री संत बेंडोजी महाराज यांनी वयाच्या सोळाव्या वर्षी संजिवन समाधी घेतली होती. याच श्री संत बेंडोजी महाराज यांच्या संजिवन समाधीचे लाखोंनी बुधवारी दर्शन घेतले. दहिहांडीनंतर यात्रा महोत्सवाला सुरूवात झाली असुन गुरूवारी शेकडो नागरिक घुईखेडमध्ये आले होते.

बुधवारी काल्याचे किर्त झाल्यानंतर भव्यदिव्य दहिहांडी महोत्सव संपन्न झाला. यामध्ये लाखो भाविक मोठ्या उत्साहात सामिल झाले होते. श्री संत बेंडोजी महाराजाच्या ऐतिहासीक पालखी सोहळ्यात संपूर्ण महाराष्ट्रातील तब्बल २७० दिंड्या शामिल झाल्या होत्या. यानंतर बुधवारी सायंकाळी ७ महाप्रसादाचे आयोजन सुध्दा करण्यात आले. या सर्व कार्यक्रमानंतर घुईखेड मध्ये यात्रा महोत्सवाला सुरूवात झाली. यात्रेत भव्य आकाश पाळणा, टुरींग टॉकीज, खेळणीचे दुकान व लोकपयोगी विविध साहित्यांची दुकाने सजली होती. गुरूवारी यात्रेकरू महिलावर्ग मोठ्या प्रमाणात संसारपयोगी साहित्य खरेदी करतांना दिसले. तर अनेकांनी आकाश पाळण्यासह इतर मनोरंजनात्मक खेळांचा आनंद लुटला. तर खाद्यपदार्थांचीही दुकाने मोठ्या प्रमाणात आली आहे. यामुळे गुरूवारी प्रचंड गर्दी पहावयास मिळाली. अजुन काही दिवस यात्रा महोत्सव चालणार असुन शनिवारी व रविवारी जास्त गर्दी पहावयास मिळण्याची शक्यता आहे.

महाआरतीचा मान धनज माणिकवाडा येथील दिंडीला

महाराष्ट्रातील विविध ठिकानांवरून २७० दिंड्या घुईखेडच्या पालखी सोहळ्यात सहभागी झाल्या होत्या. या दिंड्यांपैकी ९३ क्रमांकाची नेर (परसोपंत) तालुक्यातील धनज माणिकवाडा येथील अवधूत महाराज भजनी महिला मंडळ या दिंडीला ईश्वरचिठ्ठीने महाआरतीचा मान मिळाला. यानंतर त्यांची साळी - चोळीने सत्कार सुध्दा करण्यात आला. महाआरतीचा मान मिळाल्याने या दिंडीतील सदस्यांचा एक वेगळाच हर्ष यावेळी पहावयास मिळाला.

झाडे लावा झाडे जगवा

आज अंजनगांव बारी ते शेगांव पालखी पदयात्रेचे आयोजन

अंजनगांव बारी दि. १५ : विदर्भातील पंढरी समजले जाणारे शेगावीचे राणा श्री संत गजानन महाराज यांच्या प्रगट दिना निमित्त भाविकांनी अंजनगांव बारी ते शेगांव पालखी पदयात्रेचे आयोजन दि. १६ फेब्रुवारीला केले आहे.

१६ फेब्रुवारीला ही पदयात्रा निघणार अस्ून या पदयात्रेचे मार्गदर्शक ह.भ.प. त्र्यंबकराव बाभुळकर महाराज जामगांव, हे करणार आहे. या पालखी सोहळ्याला ह.भ.प. गजानन वाघ महाराज, पालखी सोहळ्याचे प्रमुख ज्ञानेश्वर येवतकर यांच्या प्रमुख उपस्थितीत जाणार आहे. या पालखी सोहळ्यात अंजनगांव बारी परिसरातून हजारो भाविक सहभागी होणार आहे. या पदयात्रेचे स्वागत बडनेरा, लोणी टाकळी, नवसाळ, मुर्तिजापूर, जांभा, दहीगांव, अकोला, कलोशी, शेगांव इ. ठिकाणी होणार आहे. या पदयात्रेत सतिश दुधे, प्रभाकर फुसे, विनोद निचत, चंद्रशेखर हटवार, दिनेश कडूकार, दिलीप टारपे, अशोक टारपे, राजु भांगे, महेश देशपांडे, किसन गडलिंग, विकास अंबाडकर, मनोज कुंभलकर, रामदास दातीर, परसराम निचत, डिगांबर कुंभलकार, अनिल अंबाडकार, उमेश तिरपुडे व श्री संत गजानन महाराज वारकरी सांप्रदायीक पायदळ दिंडी मंडळ यांनी अंजनगांव बारी ते शेगांव पदयात्रा दि. १६ फेब्रुवारी ते २५ फेब्रुवारीला पोहचणार आहे. या प्रगट दिना निमित्त पालखी सोहळ्यात सहभागी होण्याचे आव्हान आयोजक समितीने केले आहे.

श्री संत गजानन महाराज प्रगट दिनाचे आयोजन

शिराळा दि. १५ : स्थानिक श्री संत गजानन महाराज संस्थान तर्फे १८ ते २५ फेब्रुवारी दरम्यान प्रगटदिन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या अंतर्गत श्रीमद भागवत कथा, ज्ञान यज्ञ सप्ताह आयोजित केला असून कथा वाचन ह.भ.प. चंद्रशेखर महाराज वैद्य आळंदीकर यांच्या अमृतवाणीतून करण्यात येईल. कथा वाचन प्रारंभ १८ ते २४ फेब्रुवारी दरम्यान रोज सकाळी ९ ते १२ व दुपारी ३ ते ६ या वेळेत राहील.

श्री गजानन महाराज मुर्तीचा अभिषेक १८ फेब्रुवारीला सकाळी राहील. श्री संत गजानन महाराज विजय ग्रंथ पारायण दुपारी १ वाजता ह.भ.प. गजानन महाराज ठाकरे शिराळा यांचे अमृत वाणीतुन राहील. दैनिक कार्यक्रम प्रातःकाल ६ वाजता, काकडा आरती, सकाळी ९ ते १२ श्रीमत भागवत कथा व दुपारी १ वाजता श्री संत गजानन महाराज विजय ग्रंथ पारायण राहील. दुपारी ३ वाजता श्रीमद् भागवत कथा, सायं. ६ वाजता हरिपाठ श्री जगदंबा वारकरी मंडळ, शिराळा करतील. रात्री ८ वाजता हरी किर्तन, होम हवन, रविवार २४ फेब्रुवारीला रात्री ८ वाजता राहील. शोभायात्रा २४ फेब्रुवारीला दुपारी २ वाजता गावातील प्रमुख मार्गावरुन दिंड्यासह राहील. प्रगत दिन सोमवार २५ फेब्रुवारीला सकाळी ६ वाजता श्री संत गजानन महाराज मुर्तीचा अभिषेक बाळासाहेब देशमुख पती-पत्नी करतील. सकाळी १० ते १२ वाजेपर्यंत काल्याचे किर्तन ह.भ.प. श्याम महाराज चौबे, भक्ती धाम चांदूर बाजार करतील. दुपारी २ वाजता मान्यवरांचा सत्कार समारंभ राहील.

२५ फेब्रुवारीला प्रगट दिनाला दुपारी २ वाजता महाप्रसाद राहील. तरी भाविक भक्तांनी कार्यक्रमाचा लाभ घ्यावा अशी विनंती आयोजकांतर्फे डी.आर. वानखडे यांनी केली आहे.

सिद्धार्थ वाचनालयात आरोग्य शिबिराचे आयोजन

अमरावती दि. १५ : सिद्धार्थ वाचनालय फ्रेजरपुरा अमरावती येथे संडे मिशन व सिद्धार्थ वाचनालयाच्या माध्यमातून आज दि. १६ फेब्रुवारी रोजी दुपारी ११ वाजता भव्य आरोग्य मोफत शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये बीपी, शुगर, थायराईट, चर्म रोग, दात, डोळे, हिमोफिलीया, पक्षाघात, कर्करोग, सिकलसेल, हृदयरोग, एच.आय.व्ही. इत्यादी रुग्णाची तपासणी करुन योग्य उपचारासाठी मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या मध्ये प्रसिद्ध डॉ. तुषार राठी, डॉ. पल्लवी जाधव, डॉ. मिनाक्षी बढे, डॉ. साजिद पटेल तसेच हिन्द लॅब येथील डि.पी.सी. रुपाली ठाकरे, एल.बी.एम. दिपाली खेडकर, एल.बी.एम. प्रमोद बोराडकर हे उपस्थित राहणार आहे. तरी गरजुंनी या आरोग्य शिबिराचा अवश्य लाभ घ्यावा असे सुरेंद्र घरडे, अजय रामटेके, संदिप घरडे, सोनु बडगे, दिनेश मडावे, संदिप गणवीर, रमा घरडे यांनी आवाहन केले आहे.

विद्युत सुरक्षा सप्ताह संपन्न

अमरावती दि. १५ : महाराष्ट्र शआसनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागांतर्गत मुख्य विद्युत निरीक्षक, मुंबई तथा अधिक्षक अभियंता, नागपूर प्रादेशिक निरीक्षक मंडळ, नागपूर अंतर्गत विद्युत निरीक्षक कार्यालय, अमरावती यांचे वतीने सार्वजनिक विद्युतीय सुरक्षिततेच्या अनुषंगाने जनहितार्थ राबविण्यात येणाऱ्या विद्युत सुरक्षा सप्ताह २०१९ अंतर्गत दिनांक ११ जानेवारी ते १७ जानेवारी या कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विशेषतः विद्यार्थ्यांकरीता निबंध, चित्रकला, कविता, घोषवाक्य इत्यादी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच जन सामान्यांमध्ये विद्युत सुरक्षेबाबत संदेश पोहोचविण्याकरीता अमरावती जिल्ह्यातील विविध ठिकाणी ग्रामसभा, रॅली, चर्चासत्र इत्यादिचे आयोजन करण्यात आले होते. औद्योगिक क्षेत्रात वाढते विद्युत अपघात कमी करणेकरिता तांत्रिक कर्मचाऱ्यांकरीता कार्यशाळेचे आयोजन करणअयात आले होते. या सर्व कार्यक्रमास व्यापक प्रमाणात आर.एम. नागपुरे, विद्युत निरीक्षक कार्यालय, अमरावती यांचे मार्फत प्रसिद्धीस देण्यात आली.

डॉ. शिवरत्न शेटे यांच्या व्याख्यानाचे आयोजन

अमरावती दि. १५ : महाराष्ट्राचे भुषण जाणता राजा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त प्रख्यात वक्ते, शिवसृष्टीचे गाढे अभ्यासक डॉ. शिवरत्न शेटे यांचे जाहिर व्याख्यान विद्याभारती महाविद्यालयाच्या भव्य प्रांगणात १९ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता आयोजित करण्यात आले आहे. त्यांच्या व्याख्यानाचा विषय शुंभूपिता पुत्राचे अविस्मरणीय भावबंध असा आहे. याप्रसंगी व्यासपिठावर बुलढाण्याचे आमदार हर्षवर्धन सपकाळ, रावसाहेब शेखावत, अध्यक्ष विद्याभारती शैक्षणिक मंडळ राहणार आहे.

शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची यशोगाथा तरुण पिढीला कळावी. शिवाजी राजांची रयतेचा राजा म्हणून असलेली ओळख, त्यांच्या ठायी तरुण वयातच आलेले शहाणपण व बालवयातच उराशी बाळगलेले हिंदवी स्वराज्य स्थापन करण्याचे स्वप्न. एक नितीवंत राजा, कुशल प्रशासक व सामान्याच्या हिताचा कैवारी असे त्यांच्या ठायी असलेले गुण आजच्या तरुणांना ज्ञात व्हावे. त्यांच्या भक्तिमत्वातून उद्याच्या पिढीला प्रेरणा मिळावी हा हेतू या जाहिर व्याख्यानाचा आहे.

अमरावती शहरातील शिवप्रेमीनी, अभ्यासकांनी या व्याख्यानाचा लाभ घ्यावा असे आवाहन अध्यक्ष रावसाहेब शेखावत यांनी केले आहे.

महाराष्ट्र सब-ज्युनियर ॲथेलॅटीक स्पर्धेकरिता अमरावती संघाची निवड स्पर्धा

अमरावती दि. १५ : अमरावती जिल्हा ॲथेलॅटीक संघटना व हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १९ फेब्रुवारी रोजी हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या नवीन ॲथेलॅटीक ग्राऊंडवर वयोगट ८, १० व १२ सब ज्युनियर गट ॲथेलॅटीक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेतून निवड झालेल्या अमरावती जिल्हा संघ येणाऱ्या २ ते ३ मार्च देवरण (चिपळून) येथे आयोजित महाराष्ट्र सब-ज्युनियर ॲथेलॅटीक स्पर्धेमध्ये सहभागी होईल.

८ वर्षाखालील स्पर्धकांची वय पात्रता दिनांक ३.३.२०११ ते २.३.२०१३ या कालावधीत जन्मलेला असावा, क्रिडाप्रकार खालीलप्रमाणे ६० मी, १० मी, लांब उडी, ४ X ५० रिले शटर व १० वर्षाखालील स्पर्धकांची वय पात्रता दिनांक ३.३.३००९ ते ०२.०२.२०११ या कालावधीत असावा. क्रिडाप्रकार ८० मी, २०० मी, लांब उडी, शॉट फूट ४X१०० मी रिले व १२ वर्षाखालील स्पर्धकांची वय पात्रता दिनांक ०३.०३.३००७ ते ०२.०३.२००९ या कालावधीत जन्मलेला असावा, क्रिडाप्रकार १०० मी, ३०० मी. लांब उडी, उंच उडी, शॉट फूट, ४ X१०० मी रिले इत्यादी क्रिडा प्रकाराच्या स्पर्धा होतील. या स्पर्धेत अमरावती जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय मंडळे, शाळा, संस्था व इतर खेळाडू या स्पर्धेत सहभागी होवू शकतील.

तरी दिनांक १९ फेब्रुवारी रोजी सकाळी ७ वाजता हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या नविन ॲथेलॅटीक ग्राऊंडवर उपस्थित राहून स्पर्धेतील सहभाग निश्चित करावा. त्यासाठी डॉ. उत्तमचंद ठाकूर, प्रा. अतुल पाटील, अनित टी. कुऱ्हे, जया दलाल यांना संपर्क करावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

अमरावती बाजार भाव

किराणा बाजार
दुर्गादास किशोरकुमार डॉ. मिश्रा यांचे समोर सक्करसाथ, अमरावती.

साखर एस	३२२५-३२५०
साखर एम	३२६०-३२८०
गुळ	२३००-४०००
मसुरदाळ	५३००-५४००
चनादाल	५२००-५५००
मुंगदाळ	६२००-६८००
तुवरदाळ	६८००-७२००
बरबटी दाळ	४०००-४५००
मटकी	५२००-५७००
मुंग मोगर	७३००-७४००
उडद मोगर	६२००-६८००
तांदूळ लुचई	२७००-२९००
तांदूळ कोलम	४१००-४५००
हिरवा वाटाणा	७२००-७४००
बेसन चरखा (१०किलो)	५७७
बेसन स्वस्तीक (१०किलो)	५७७
रस्सी बंडल	६५०-७००
सोप	१९०-२१०
जीरा	१९०-२१०
रद्दी	१६०-१८०
खोबरेल तेल	१४००-१८००
आटा (५० किलो)	७७०-११५०
रवा (५० किलो)	१३००-१४००
मैदा (५० किलो)	१२५०-१२८०
नारियल ओला	१३५०-१४००
२०० भरती	३६००-४०००
प्रकाश ब्रँड	१७००
शुध्द ब्रँड (सोयाबीन)	१२८०
साबूदाना	४९०-५१०
भगर	६८०-७५०
फटका दाळ	७६००-७८००

भगवानदास नथमल
फोन:२५७२१४१/२५७८१४१

फल्ली तेल	११५-००
सोयाबीन तेल	८५-००
माजी तेल १ लि.(एगमार्क)	१२२
२४ कॅरेट १लि.	८३-००
सरकी रिफाईन	८५-००
खोबरेल तेल	१००-००

१५ किलोचे भाव

माजी	१८००-००
फल्ली तेल	१६५०=००
अशोक ब्रँड	१६५०=००
उत्तम सोयाबीन	१२७५=००
सरकी रिफाईन	१३१०=००
खोबरेल तेल	१६५०=००
सुनेहरा ड्रॉप	१४००=००

१०० किलोचे भाव

फल्ली तेल	१२५००=००
सोयाबीन	८२५०=००

प्रल्हाद ना. अग्रवाल
फोन २६६३०९७/२६६३०९६

सरकी (प्रति क्विंटल)	-
सरकी ढेप (प्रति किं.)	-

कांदा(गावरानी) पांढरा	४००-९००
कांदा (नाशिक)	४००-८००
आलु(पांढरा)	६००-९००
आलू लाल	६००-१०००
लसून	६००-२०००
अद्रक	५०००-६०००
टमाटर	१२००-१४००
वांगे	१४००-१६००
फुल गोबी	१४००-१६००
पत्ता गोबी	७००-८००
पालक	६००-७००
मेथी	८००-१०००
कारला	४०००-४२००
बरबटी शेंगा	४२००-४४००
गाजर	१२००-१४००
सांभार	७००-८००
काकडी	२२००-२४००
भेंडी	४०००-४२००
सुखी मिरची	६०००-१२०००
हिरवी मिरची	२२००-२४००
मिरची शिमला	२४००-२६००
कोहळ	१०००-१२००
बिट	१०००-१२००
वाटाणा	१२००-१४००

फळ मार्केट

मोसंबी	२२००-२८००
चिकु	१५००-२०००
सेफ	५०००-७०००
पपई तायवान	१२००-१५००
निंबु	१८००-२२००
बोर	८००-१४००
टरबूज	४००-८००
हिरवा चना	८००-१०००
खरबूज	१२००-१८००
संत्रा चुरा	१८००-३२००

कृषि उत्पन्न बाजार समिती, अमरावती

धान्य विभाग फोन २५७२०२४, २५७२१७८

ज्वारी (गावरानी)	२१००-२५००
ज्वारी (संकरीत)	१७००-२०००
गहू (लोकवन)	२०००-२२५०
गहू (नर्मदा) नवीन	२७५०-३०००
गहू (१४७) नवीन	१९२५-२१५०
तूर (नविन)	५१००-५५००
तूर (मिडीयम)	४५००-४९००
मुंग नवीन	४५००-४८५०
मुंग नवीन (चमकी)	५०००-५३५०
उडीद (नविन)	४२००-४७५०
हरभरा (नविन)	४२००-४५५०
हरभरा (जॅकी)	४२००-४४५०
बाजरा	१८००-३९००
सोयाबीन	३३५०-३६३९
मिडियम सोयाबीन	--
सिड सोयाबीन	--
तीळ (पांढरी)	९०००-१२५००
तीळ (गजर)	७५००-१०००
मका (लाल)	१६००-१७००
जवस	४६००-४६५०
भुईमुंग (जापानी)	५०००-५३००
भुईमुंग १२-२४ नवीन	४०००-४३००
जपानी भुईमुंग	-
कापुस	५२००-५४५०